




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ३१७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.२८ जून २०२५


## ठाकरे बंधूंच्या मोर्चाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीर पाठिंबा

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२७, मुंबई :**

शालेय शिक्षणात हिंदी विषय सक्तीचा केल्याने वादाला तोंड फुटले आहे. कालच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राज ठाकरे ंची भेट घेतली. मात्र, राज ठाकरे हे आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. हेच नाही तर ५ जुलैला मुंबईमध्ये शालेय शिक्षणात हिंदी सक्ती केल्याने त्याच्याविरोधात मोर्चा काढला जाणार आहे.



यानिमित्त्याने दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचा मोर्चा आहे. राज ठाकरे यांनी म राठीसाठी या मोर्चात सर्व पक्षांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. अगोदर या मोर्चाची तारीख ही ६ जुलै असल्याचे राज ठाकरेंनी जाहीर केले. मात्र, आता शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्र येऊन हा मोर्चा ५ जुलैला निघेल. आता या मोर्चाबद्दल शरद पवारांच्या पक्षानेही मोठा निर्णय घेतलाय.

५ तारखेच्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने जाहीर पाठिंबा दिलाय. महाराष्ट्राहिताचा प्रश्न उभा राहतो, तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केली भूमिका. मराठीच्या समर्थनार्थ पुकारलेल्या ५ जुलै रोजीच्या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने पाठिंबा दर्शविला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी एक पत्र ट्विट करत भूमिका स्पष्ट केली आहे.

मार्ग ठरेना, वेळ जुळेना; शिवसेना उबाठा, मनसेत मोर्चासंदर्भात चर्चा; 'म ार्ग' कसा निघणार?

पत्रात जयंतराव पाटील यांनी म्हटले की, महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) याअंतर्गत त्रिभाषा सूत्राचं समीकरण पुढे करत इयत्ता पहिलीपासून शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषा बंधनकारक करण्याचे योजिले आहे. ह्याविरोधात महाराष्ट्रात मराठी भाषिकांम ध्ये टोकाचं जनमत तयार होत आहे. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ञ, भाषातज्ञ अशा सर्व मान्यवरांनी त्रिभाषा सूत्र इयत्ता पहिलीपासून राबविण्यास विविधं आक्षेप नोंदविले आहेत. पण कुणालाही न जुमानता राज्य सरकार 'हिंदी सक्ती'साठी हट्ट धरून बसलं आहे असे ते म्हणाले.

खरं तर, महाराष्ट्राच्या जनमानसाचा कानोसा घेतलात तर जाणवतं की, कुणाचाही विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेलाही विरोध नाही, पण इयत्ता पहिलीपासूनच प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे, जो योग्य आहे. शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार, ह्याची सत्ताधाऱ्यांनी नोंद घ्यावी असा इशाराही दिला.

महाराष्ट्र सरकारच्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) अंतर्गत त्रिभाषा सूत्रान्वये केल्या जाणाऱ्या हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी येत्या शनिवारी, ५ जुलै २०२५ रोजी तमाम मराठीजनांकडून मुंबईत एक मोर्चा पुकारण्यात आला आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचा ह्या मोर्चाला संपूर्ण पाठिंबा आहे. महाराष्ट्राहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे. म्हणून पदाधिकारी, कार्यकर्ते सर्वांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे जयंत पाटील यांनी आपल्या पत्रात म्हटले.

## ठाणेकर अवघ्या १५ मिनिटात बोरिवलीला पोहचणार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, ठाणे :** राज्यातील ज्या शहरांची लोकसंख्या गेल्या काही वर्षात झपाट्यानं वाढली त्याम ध्ये ठाणे शहराचा समावेश आहे. ठाण्याहून रोज हजारो जण मुंबईतील पश्चिम उपनगरात जात असतात. ठाणे आणि बोरिवली भागात जाण्यासाठी सध्या घोडबंदर रोडचा पर्याय आहे. पण, या रस्त्यावर रोज वाहतूक कोंडी होती. त्यामुळे वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो.

ठाणे-बोरिवली या मार्गावरील ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि हे अंतर कमी करण्यासाठी राज्य सरकारकडून 'ठाणे-बोरीवली ट्वीन टनल प्रकल्प' तयार करण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ठाणेकर अवघ्या १५ मिनिटांमध्ये बोरिवलीला पोहचणार आहे.

मुंबईकरांच्या आयुष्यातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे वेळ वाचवणारा हा प्रकल्प कधी पूर्ण होणार? याकडं सर्वांचं लक्ष लागलंय. या प्रकल्पाची आढावा बैठक आज (गुरुवार २६ जून २०२५) झाली. त्यावेळी हा प्रकल्प डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करा, असे निर्देश



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

राज्यातील कोणताही पायाभूत प्रकल्प यापुढे रखडणार नाही याची दक्षता घ्या आणि प्रत्येक प्रकल्प पुढील ३ वर्षांत पूर्ण करा.ठाणे ते बोरीवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे.दुहेरी बोगदा प्रकल्प डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करा.बोगद्यात हवा खेळती राहण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानमधील अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करा.प्रकल्पाच्या निर्मितीसाठी वन विभागाची दुसऱ्या टप्प्यातील परवानगी, रात्री काम करण्याची परवानगी घेण्यात यावी.बोरीवली बाजूकडील काम गतीने पुढे जाण्यासाठी आणि या बाजूकडील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून १ महिन्यात कार्यवाही पूर्ण करा.यंत्रणांनी समन्वय ठेवून प्रकल्पग्रस्तांना भाडे देऊन अथवा अन्य गृहनिर्माण प्रकल्पात पुनर्वसनासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करा. संबंधित अधिकाऱ्याने १ महिना कारवाई करीत पुनर्वसन पूर्ण करावे.बोरीवली बाजूकडील अदानी, टाटा पॉवर प्रकल्पातील आवश्यक असलेल्या जमिनीचे संपादन करा.भूमिगत वीज वाहिन्या टाकण्यासाठी अदानी पॉवर कंपनीला रस्त्याचे अंतिम नियोजन द्यावे.

ठाणे ते बोरीवली दुहेरी बोगदा ११. ८४ किलोम ीटर लांबीचा आहे. हा प्रकल्प २ पॅकेज मध्ये उभारण्यात येणार आहे. बोरीवली बाजूने ५. ७५ किलोमीटर पॅकेज १ आणि ठाणे बाजूने ६. ०९ किलोमीटर पॅकेज २ असणार आहे. पॅकेज १ मध्ये ₹६,१७८ कोटी आणि पॅकेज २ मध्ये ₹५८७९ कोटी अशाप्रकारे एकूण १२,०५७ कोटी रुपये खर्च या प्रकल्पाला अपेक्षित आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कार्बन उत्सर्जन प्रतिवर्ष १. ४ लाख मेट्रिक टनाने कमी होणार. सध्याच्या रस्त्याने ठाणे ते बोरीवली जायला एक ते सव्वा तास लागतो. बोगदा पूर्ण झाल्यानंतर हा कालावधी अवघ्या १५ मिनिटांवर येणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर इंधनही वाचणार आहे.

## जगन्नाथ पुरीतील रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी
## ४० पेक्षा जास्त भाविक बेशुद्ध !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, ओडिशा :** ओडिशात चेंगराचेंगरी झाल्याची घटना समोर आली आहे. पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेत चेंगराचेंगरी झाल्याने ४० हून अधिक भाविक गंभीर जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

ही घटना पुरी येथील श्री नहर (राजाचा राजवाडा) जवळ झाल्याचे बोलले जात आहे. मात्र या घटनेत अद्याप कोणत्याही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. चेंगराचेंगरीनंतर अनेक भाविक बेशुद्ध पडले होते. यातील काहींना पुरीच्या वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार शुक्रवारी रथयात्रेतील 'पहाडी' सोहळ्यादरम्यान



गजपती दिव्य संघदेवाच्या राजवाड्याजवळ लोकांची गर्दी जमली होती. ही गर्दी नियंत्रित करण्यात प्रशासनाला अडचण येत होती. यात गर्दीदरम्यान भाविकांमध्ये गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. त्यामुळे भाविकांनी अचानक धावपळ केली, ज्यामुळे काही लोक चेंगरून बेशुद्ध पडले.

**भाविकांवर उपचार सुरु...**

समोर आलेल्या माहितीनुसार या घटनेत ४० पेक्षा जास्त भाविक जखमी झाले आहेत. या सर्व जखमींना पुरी मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या जखमींच्या उपचाराची योग्य व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. सध्या पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे, त्यामुळे मोठा अपघात टळला आहे.

**२०२४ मध्येही झाली होती चेंगराचेंगरी...**

याआधी २०२४ मध्येही पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी झाली होती. त्यावेळी गर्दीत गुदमरून एका भाविकाचा मृत्यू झाला होता. गेल्या वर्षी भगवान जगन्नाथाचा रथ पुरीच्या ग्रँड रोडवरून जात असताना ही घडली होती. त्यामुळे अशी घटना टाळण्यासाठी यंदा प्रशासनाने कडक पावले उचलली होती, मात्र तरीही धोका टळू शकला नाही आणि यंदाही चेंगराचेंगरी झाली.

## थोडक्यात

### काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा रेशनिंगचा तांदूळ जप्त



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, जामखेड (अहिल्यानगर) :** काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणाऱ्या रेशनिंगच्या ४०० गोण्या तांदूळ गुन्हे शाखेने छापा टाकत जप्त केल्या आहेत. जामखेड-करमाळा रोडवर जामखेड येथे गुरूवारी सकाळी ही कारवाई करण्यात आली.

सुंदर बबन घुमरे (रा.लोणी, जामखेड) आणि योगेश मोहन भंडारी या दोघांविरोधात जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना खबर्याकडून रेशनिंगचा तांदूळ काळ्या बाजारात जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकाला कारवाईचे आदेश दिले. जामखेड ते करमाळ रोडने मालमोटारीतून शयितरित्या दिसला.

पोलिस पथकाने त्यास जामखेड आयटीआय येथे अडविले. वाहनाची तपासणी केली असता ट्रकमधील गोण्यामध्ये तांदुळ मिळून आला.वाहन चालक घुमरे याच्याकडे विचारपूस करता मालमोटार स्वत:ची असल्याचे त्याने सांगितले. जाम खेडमधील योगेश मोहन भंडारी याच्या दुकानातून तांदळाच्या गोण्या घेतल्या. तांदूळ रेशनचा शासकीय स्वस्त धान्य वितरण योजनेतील असून तो विक्रीसाठी सांगली येथे घेऊन जात असल्याची कबुली दिली. मालमोटार, तांदूळ असा तीस लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. जामखेड पोलिस ठाण्यात जीवनावश्यक वस्तु अधिनियम कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विदर्भात पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा इशारा



**दि.२७, नागपूर :** येत्या २४ तासांमध्ये नागपूर आणि आसपासच्या परिसरात म ुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यंदा राज्यात वेळेपूर्वीच मान्सूनचं आगमन झालं होतं, सामान्यपणे राज्यात मान्सून ७ जून रोजी दाखल होतो, मात्र यावेळी तब्बल १२ दिवस आधीच म्हणजेच २५ मे रोजीच राज्यात पावसानं एन्ट्री केली.

त्यानंतर ३० मे पर्यंत राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसानं जोरदार हजेरी लावली, मात्र त्यानंतर पावसात खंड पडला, दरम्यान दहा जूननंतर राज्यात पुन्हा पाऊस झाला आणि त्यानंतर परत खंड पडला, मुंबई वगळता इतर भागांम ध्ये अत्यल्प पाऊस झाला. आता दिलासादायक बाब म्हणजे वीस जूननंतर पावसाचा वेग वाढला असून, अनेक भागांमध्ये पावसानं दमदार हजेरी लावली आहे, विदर्भात जोरदार पाऊस सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे.

दरम्यान येत्या २४ तासांमध्ये नागपूर आणि आसपासच्या परिसरात म ुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

बुधवारी रात्री पावसाने धुवाधार हजेरी लावली, मात्र गुरुवारी दिवसभर फक्त ढगाळ वातावरण होतं, त्यानंतर गुरुवारी संध्याकाळपासून पावसाची रिपरिप जिल्ह्यात सर्वत्र सुरू झाली, सावनेर तालुक्यात सर्वाधिक ५६ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे.

### भरधाव कार चालकाने बारावीच्या विद्यार्थिनीला उडवलं...



**दि.२७, नाशिक :** भरधाव कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याने सायकलस्वार महाविद्यालयीन विद्यार्थिनीला उडवले. यानंतर भिंत पाडत ही कार पावभाजीच्या दुकानावर जाऊन धडकली. नाशिकमधील काठे गल्ली परिसरातील त्रिकोणी गार्डन पोलिस चौकीजवळ हा अपघात झाला. यामध्ये विद्यार्थिनी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्र लक्ष्मण ठोके, वय ५५ वर्ष, असे कार चालकाचे नाव आहे. दुपारी चार वाजताच्या सुमारास ते कार (क्र. एमएच १५ इबी ०८४२) घेऊन पत्नीसह बनकर चौकाकडून समर्थ टी पॉइंटच्या दिशेने चालले होते. त्रिकोणी गार्डन पोलिस चौकीजवळ ठोके यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले. याचवेळी सायकलवरून खासगी क्लासला चाललेली बारावीत शिकणारी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी रीतीका प्रवीण पंडित, वय १७ वर्ष, हिला ठोके यांच्या कारची धडक बसली. या अपघातात विद्यार्थिनी गंभीर जखमी झाली असून, तिला उपचारांसाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर ठोके यांचे वाहन एका भिंतीला धडकत नंतर साई श्रद्धा पावभाजी या दुकानाला जाऊन धडकले. यामुळे या दुकानाचे आणि समोरील हातगाड्याचेही नुकसान झाले. दरम्यान, संबंधित कारचालक पोलिस कर्मचारी असल्याचे समजते. परंतु, त्यास दुजोरा मिळू शकला नाही. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

## संपादकीय

### बस हवी आपली

'बेस्ट'सारख्या उपक्रमांनी बसगाड्या विकत न घेता भाड्यावर घेतलेल्या आहेत. तिथेच सारी गोम आहे.

मुंबईत डबलडेकर बसमधून सर्वांत पुढच्या सीटवरून समुद्रदर्शन घेत प्रवास करण्यातली मौज ही अनेकांसाठी स्मरणीय असेल. आता या डबलडेकर वातानुकूलित झाल्या आहेत. बेस्ट बसची अशी अनेक वैशिष्ट्ये वर्षानुवर्षे होती.

बसमार्गाचा फलक हा कापडी रोलमध्ये काचबंद असे. आगार जवळ आले की बसच्या सर्व खिडक्यांची तावदाने बंद करण्याचे बंधन वाहकावर असे. सध्या मात्र अनेक मार्गांवर बेस्ट बसची प्रतीक्षा ही मोठी समस्या आहे. याच पार्श्वभूमीवर आता मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसईविरार, बदलापूर, अंबरनाथ अशा मुंबई महानगर क्षेत्रातील सार्वजनिक वाहतुकीची एकत्र मोट बांधण्याची योजना आकारास येते आहे.

गेल्या दोन-चार वर्षांपासून सर्व महानगरांमध्ये विजेवर धावणाऱ्या बसगाड्या सार्वजनिक सेवांमध्ये समाविष्ट होत आहेत. त्यात जास्त गचके बसत नाहीत. त्या स्वयंचलित गिअरच्या असल्याने चालकाला शिणवटा कमी येतो. त्यावरचा देखभालीचा खर्च व गरज कमी असल्याने त्या अधिकाधिक काळ रस्त्यावर चालू शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या चालविण्याचा खर्च किलोमीटरमागे डिझेलच्या बसच्या तुलनेत अर्धा किंवा एकतृतीयांश इतका असतो. परंतु या बसच्या किमतीही तुलनेत दुप्पट असतात. डिझेल-सीएनजीची बस ५० ते ७० लाखांपर्यंत येत असेल, तर विजेवरच्या बसगाड्यांची किंमत सव्वा ते दीड कोटींच्या घरांत जाते. यात सर्वाधिक किंमत ही लिथियम बॅटरीची असते. गेल्या दोन-अडीच वर्षात या बॅटऱ्यांबाबत आपण स्वयंपूर्ण होऊ, ही अपेक्षा फोल ठरली. आजही बॅटऱ्यांसाठी बहुतांशकरून चीनवरच अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी कारखान्यांकडून अपेक्षित प्रमाणात बस बाहेर पडत नाहीत. बहुतांश वाहतूक उपक्रमांना याचा फटका बसतो आहे.

बेस्टसारख्या सार्वजनिक वाहतूक उपक्रमांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा बदल म्हणजे त्यांनी या विजेवरच्या बसगाड्या विकत न घेता त्या 'ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट' म्हणजे प्रतिकिलोमीटर दर देऊन चालवायला घेतलेल्या आहेत. त्यात चालक व देखभालीचीही तरतूद आहे. थोडक्यात म्हणजे आपण एखाद्या सहलीला जाताना गाडी भाड्याने घेतो, तेव्हा दिवसाला ३०० किलोमीटर आणि प्रतिकिलोमीटरचा दर आपण मोजतो. त्याच धर्तीवर इलेक्ट्रिक बसउत्पादकांकडून किलोमीटरमागे ४८, ६०, ७० रुपये अशा वेगवेगळ्या दरांनी, विविध उपक्रमांनी बस भाड्यावर घेतल्या आहेत. इथेच सगळी गोम आहे. बस वेळेवर सुटली पाहिजे; अन्यथा दंड वगैरेची तरतूद या कंत्राटात जरूर आहे. तसा दंडही आकारला जातो. परंतु बसउत्पादन रोडावल्याने कंपन्यांना आता हा आतबट्ट्याचा व्यवहार वाटू लागला आहे. त्यामुळे अशा भाडेपट्ट्यावर बस पुरविण्यात त्यांना फारसा रस नाही. त्यापेक्षा थेट खरेदीवाले कुणी ग्राहक असल्यास त्यांना पसंती असते. कंत्राट रद्द झाल्याचा आनंदच होईल, असे सध्या कंत्राटदार खासगीत म्हणतात. साहजिकच अनेक ठिकाणी पुढच्या बसगाड्या आलेल्याच नाहीत. बेस्टच्या डबलडेकरची संख्याही आहे तिथेच थांबली आहे. एकेकाळी बेस्टच्या ताफ्यातील सर्व बसगाड्या स्वतःच्या मालकीच्या होत्या.

आज अडीच हजारापैकी केवळ चारशे-साडेचारशे बसगाड्याच स्वतःच्या मालकीच्या आहेत. बस उत्पादक कंपन्यांना दंड आकारून काम भागणारे नाही. त्यांनी वेळेत बस उपलब्ध करून देणे ही आजची निकड आहे. छोट्या गल्लीबोळांतून वाट काढण्यासाठी कंत्राटदारांमार्फत सुरू झालेल्या मिनी-मिडी किंवा व्हॅनसारख्या बसगाड्याही बाद झाल्या आहेत. दुसरीकडे ॲपआधारित खासगी सिटीफ्लो, मायलो आदी बससेवांना प्रवासी थोडे अधिक पैसे मोजूनही पसंती देत आहेत. पूर्वी बेस्टच्या बसमध्ये छोट्या छोट्या सुविधांवर काटेकोर लक्ष दिले गेले. आता नव्या बसगाड्यांमध्ये चालकाशेजारच्या अरुंद पायऱ्या किंवा तत्सम अडचणींवर मार्ग निघण्याची शक्यता धूसर झाली आहे. केवळ प्रवासी कमी झाले म्हणून बसमार्ग बंद करणे हा उपाय ठरत नाही. सामाईक बससेवा उभारताना या सर्व बाबींवर सखोल विचार करावा लागेल.

# मादक पदार्थांना नको म्हणाच!

भारतात एनडीपीएस ॲक्ट- नार्कोटिक ड्रग्ज ॲन्ड सायकोट्राफिक सब्सटंन्सेस ॲक्ट-१९८५अनुसार नशीले पदार्थ वापरणे गुन्हा आहे. ड्रग्ज तुम्ही तुमच्यासाठी वापरा किंवा दुसऱ्या कामासाठी वापरा, तो गुन्हाच आहे. त्याला दंड हा ड्रग्स किती प्रमाणात वापरतो, याच्यावर अवलंबून असते. जर एखाद्याला ड्रग्स बाळगण्यासाठी किंवा सेवन केल्यामुळे शिक्षा झाली असेल आणि त्याची सुधारायची इच्छा असेल, तर तो एखाद्या डी-ॲडिक्शन सेंटरमध्ये उपचार घेऊ शकतो. त्याने उपचार मध्येच थांबवले आणि परत व्यसनाकडे वळला तर त्याला परत शिक्षा होऊ शकते. ग्रामीण भागात अमली पदार्थ सेवनाचे प्रमाण कमी आहे. मात्र शहरांच्या ठिकाणी याचे प्रमाण वाढत आहे. हे चिंताजनक आहे. मुंबईत ग्रँट रोड स्टेशन, दाणाबंदरला जाणारा ब्रीज, डॉकयार्ड कॉलनीतल्या वस्त्या, माहीम कोळीवाड्याकडे जाणारा ब्रीज, कुर्ला-सांताक्रुझ जोडमार्गाच्या समोरील गल्ल्या, मानखुर्द, शिवाजीनगर, गोवंडी आदी ठिकाणच्या झोपडपट्ट्या, खाडीच्या किनारीलगतच्या झोपडपट्ट्या इथं नशा करणारी टोळकी आपल्याला दिसतात. त्यांना आपण गर्दुले म्हणतो. हे गर्दुले आपली नशा भागविण्यासाठी कोणत्याही थराला जावून गुन्हेगारीकडे वळतात. चोरी, लुटमार, मोबाईल चोर, महिलांच्या गळ्यातील दागिने यातून ते पैसे मिळवून नशा करतात. शिवाय बलात्कार, मारामारी, खून करण्याची त्यांची प्रवृत्ती वाढत आहे. केवळ जिज्ञासेपोटी अमली पदार्थांची चव चाखणारे आज या गर्तेत आपोआपच सापडले जात आहेत. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच उच्चभ्रू वर्गातील लोकही यात गुरफटू लागले आहेत. सुरुवातीला कोणीही अमली पदार्थ व्यसनाधीन होण्यासाठी सेवन करीत नाही. काही विद्यार्थी अभ्यास करताना झोप येऊ नये, म्हणून सुरुवातीला अमली पदार्थाचे सेवन करतात. मुलीही अमली पदार्थाच्या विळख्यात अडकू लागल्या आहेत. बाजारात नशा आणणारे अनेक पदार्थ मिळतात. काही औषधांनीही नशा येते. काहीजण अमली पदार्थ शरीरात टोचून घेतात, पण कोणताही अमली पदार्थ हा शरीरासाठी घातकच आहे. या विळख्यात गटांगळ्या खाणाऱ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामाविषयी जागृती करण्यासाठी २६ जून या दिवसाचे महत्त्व आहे. अनेक कार्यक्रमांनिमित्त याविषयी जनजागृती आणि या पदार्थांपासून दूर कसे राहावे, तसेच आपल्या प्रकृतीविषयी गंभीर राहण्याविषयी सावध केले जाते. शैक्षणिक संस्थांबरोबरच इतर सेवाभावी संस्थाही या कामात पुढाकार घेत आहेत. यात आता सामान्य माणसांचाही सहभाग असणे अपरिहार्य बनले आहे. इतकी ही समस्या जटील बनली आहे. आपल्या बॉलिवूडमध्ये नुकताच उडता पंजाब! हा चित्रपट येवून गेला. यात पंजाबमध्ये पाकिस्तान सीमेवरून अमली पदार्थाची तस्करी केली जात असल्याचे दाखविले आहे. याचा अर्थ आपल्या शेजारील देशातून म्हणजेच पाकिस्तान, नेपाळ, बांग्लादेश, अफगाणिस्तान, भूतान येथून अमली पदार्थ आपल्या देशात येतात. याची किंमतही लाखो रूपयात असते. याची खरेदी-विक्रीही सांकेतिक चिन्हे, खुना व भाषांच्या माध्यमातून होते. हशीशसारखे अंमली पदार्थ नेपाळमधून



पुरविले जातात. नायजेरियनांकडून भारतात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी केली जाते. नायजेरियन विद्यार्थी वा कपड्यांचे व्यापारी या माध्यमातून ही तस्करी केली जाते. नायजेरिया देशातील नागरिक किनारी भागात मोठ्या प्रमाणात वावरताना दिसतात.

नशेची लक्षणे- वर्तणुकीत अचानक बदल घडतो. अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या मुलांची शाळेत उपस्थिती कमी होऊ लागते. अभ्यासात, खेळ किंवा अन्य कार्यक्रमात त्याचे मन लागत नाही. पॉकेटमनी वाढविण्यासाठी सतत पालकांकडे तगादा लावतात. घरातील वस्तू हळूहळू गायब होणे. जुने मित्र सोडून नवीन मित्र बनविणे. बाथरुममध्ये जास्त वेळ घालविणे. घरात इंजेक्शन अथवा सिरिंज आढळणे. डोळे लाल, निस्तेज होणे, डोळ्यांखाली सूज येणे. बोलताना अडखळणे, उभे राहण्यासाठी त्रास होणे. भूक न लागणे. वजन कमी होणे. व्यक्तिगत स्वच्छता, कपड्यांबद्दल बेफिकिरीने वागणे. निद्रानाश, व्यसनाचा परिणाम फुफ्फुस, स्मरणशक्ती, अवयव निकामी होतात, अस्वस्थता, मानसिक आजार वाढतात. यावर उपाय- पालकांनी आपल्या पाल्याला समजून घ्यावे. त्यांना तंबाखू, विडी, सिगारेट, खर्रा, गुटखा, दारू आणण्यास पाठवू नका. त्याच्याशी मित्र म्हणून वागा. काय वाईट..काय चांगले हे गोडीने व मित्रत्वाच्या नात्याने पटवून द्या. त्याच्याशी प्रेमाने वागा...त्याला विश्वासात घ्या. वाईट मित्रांची संगत करू देऊ नका. वेळीच सावध करायला हवे. शिक्षकांचे हुशार मुलांबरोबर कमी मार्क्स असलेल्या मुलाकडेही तितकेच लक्ष हवे. कोणत्याही मुलाला कमी लेखू नका. तसे झाले तर ते व्यसनाकडे वळली जातात. औषधोपचार- मानसोपचार तज्ज्ञांकडून समुपदेशन, शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून मद्य आणि अमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजना म्हणून स्वयंसेवी संघटनांना पुनर्वसन केंद्र चालवण्यासाठी अनुदान दिले जाते. व्यसनविरोधी शिबिरांचे आयोजन करणे, जनजागृती करणे, व्यसनाधीन युवकांचे पुनर्वसन करणे अशा उपाययोजनांसाठीही आर्थिक सहाय्य पुरवले जाते. शाळा-महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना अमली पदार्थाच्या घातक परिणांमाविषयी माहिती दिली जाते. शिवाय मुंबईत केईएम हॉस्पिटलनंतर आता राजावाडी हॉस्पिटलमध्येही अमली पदार्थ व्यसनाधीन झालेल्यांवर मोफत उपचार केले जातात.

तरूणांना अमली पदार्थाचा विळखा...अमली पदार्थाची विक्री करताना टोळीला अटक...रेल्वे फूटपाथवर चालतो अमली पदार्थाचा धंदा... अमली पदार्थाच्या सेवनाने दोघांचा मृत्यू...विमानतळावर तीन कोटींचे ड्रग्ज सापडले... दोघांना अटक...अशा आशयाच्या बातम्या आपण रोज वर्तमानपत्रात व न्यूज चॅनेलवर वाचतो, ऐकतो. आजची बहुसंख्य तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात सापडली आहे. आपल्या देशाच्या हद्दीत अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या देशाला लागून असल्यामुळे याचे प्रमाण वाढत आहे. पालकांना तरूणांना यापासून रोखण्याची समस्या सतावत आहे. शासनाने अशा पदार्थांवर बंदी घातलेली आहे. दरवर्षी २६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो.

भावी तरूण पिढीला वाचविण्यासाठी शासनच सरसावले आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद ४७मध्ये सार्वजनिक आरोग्य आणि जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजनाव्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यानुसार राज्यांचे व्यसनमुक्ती धोरण निश्चित करण्यात आले असून या विभागाच्या दिनांक १७ ऑगस्ट २०११च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्राने सन १९८७पासून अमली पदार्थ हा विषय महत्वाचा मानला आहे. भारतात नार्कोटिक ड्रग्स ॲण्ड सायकोट्रॉपिक सबटंन्स ॲक्ट-१९८५- एनडीपीएस हा अंमली पदार्थ विरोधी कायदा आहे. मालद्वीप सरकारने संयुक्त राष्ट्रांना मादक पदार्थांच्या संबंधित संमेलनासाठी अनुमोदन दिले आणि पहिले अंमली पदार्थावर आधारित संमेलन सन१९६१ला झाले. दुसरे संमेलन १९७१मध्ये अवैध सायकोट्रापिक पदार्थ यावर झाले. गैरकानुनी धंद्याच्या विरोधात सन १९८८मध्ये तिसरे संमेलन झाले. या कायद्यांतर्गत अमली वस्तू किंवा औषधाचे उत्पादन, वितरण, सेवन, विक्री, वाहतूक, साठा, वापर, आयात-निर्यात यावर देशात बंदी आहे. प्रत्येक व्यक्ती, मुले, मुली यांच्यामध्ये जनजागृती व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या सामाजिक व विशेष सहाय विभागाने उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. राज्यात जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी यांनी २६ जून या दिवशी आपल्या परिसरातील शाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करायचे आहे. गावात/शाळामधून अमली पदार्थ विरोधी फेरी काढणे, अमली पदार्थावर बंदी याविषयी निबंध स्पर्धा आयोजित करणे, व्यसनमुक्ती हीच राष्ट्रभक्ती याविषयी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, अमली पदार्थावर पथनाट्याचे आयोजन करणे, अमली पदार्थ विरोधी जनजागृती करणे, अमली पदार्थाच्या सवयी सोडविण्यासाठी या दिवशी निर्धार प्रतिज्ञा देणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. शिवाय अमली पदार्थाच्या विरोधी काम करणाऱ्या व्यक्ती, सामाजिक संस्था, संघटना यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांनी मदत करावयाची आहे, याबाबतचे शासन परिपत्रक १९ जूनला पारित झाले आहे.

ज्या पदार्थांच्या सेवनाने माणसाला विशिष्ट प्रकारची सुस्ती, नशा, तार किंवा धुंदी येते. त्यांना रुढार्थाने मादक पदार्थ किंवा अमली पदार्थ म्हणतात. अफू व त्यापासून तयार केलेले मॉर्फीन, हेरॉईन इ.पदार्थ, कोकेन, भांग, गांजा, चरस- हशिश वगैरे पदार्थाचा मादक पदार्थात समावेश केला जातो. ब्राऊन शुगर, झंडूबाम रुमालावर टाकून त्याचा नाकाद्वारे वास घेतात. यातून त्यांना नशा येते. स्पिरीटचाही नशेसाठी अशाचप्रकारे वापर केला जात आहे. यापुढेही जाऊन श्रीमंत लोक सिंथेटीक अमली पदार्थ आणि आता घातक जीवघेणा एमडी- मेफेड्रॉनचा वापर होऊ लागला आहे. शिवाय मॅजिक मशूम, एलसीडी, मारिजुआना, म्याव-म्याव, डॅरनेक्स, शिलावती, वेदनाशामक गोळ्या, व्हाईटनर ते औषधे याचाही वापर नशेसाठी केला जाऊ लागला आहे. तज्ज्ञ म्हणतात, की अमली पदार्थांचे सेवन हा एक मानसिक आजार आहे. याचे सेवन करणारे चटावलेले असतात. याचा वाईट परिणाम हा त्या व्यक्तिच्या आयुष्यावर तर होतोच, मात्र कुटुंब आणि समाजावरही होत असतो. सर्व व्यसनांवर निश्चित उपचार आहेत. अमली पदार्थांच्या विळख्यातून सहजपणे बाहेर येण्यासाठी योग्य तज्ज्ञ व योग्य कालावधीमध्ये उपचार व्हायला हवेत. अमली पदार्थ वेळेवर न मिळाल्याने किंवा महाग झाल्याने युवकांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होत आहे. यात महाराष्ट्रातील युवकांचा क्रमांक वरचा आहे. आपले जीवन सुंदर आहे. ते एकदाच मिळत असते. अमली पदार्थांपासून दूर राहून आपले जीवन सुंदर बनवा. आरोग्याला महत्त्व द्या... व्यायाम करा...खेळ खेळा...पण बाळानो, अमली पदार्थांना थारा देऊ नका रे!

**!! जागतिक मादक पदार्थ नकार दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

### स्टेटस् रे...

व्हॉटसॅपवरे स्टेटस
सांगते काय मनांत
उघडी होती गुपिते
हळूचं बोले कानांत

व्यक्त हो सहजपणे
सात आठ शब्दांत
आशय कळून जाई
अशक्यजे निबंधात

काय म्हणती साहेब
चर्चा रंगतात जनात
ब्रेकिंग न्यूज झळके
वर्तमान पत्रा पानात

भ्यायचे का कुणाला
सांगायचे सन्मानात
स्पष्ट वक्ता असे नेता
भर पडे अभिमानात


परिणाम साधेबरोबर
युध्दचाले रणांगणात
नकोभाषणे तासभर
मेसेज दे एकाक्षणात

लोक गुंगले संभ्रमात
राहूद्या त्या अज्ञानात
प्रश्न सोडवी भराभरा
प्रगती धन्य विज्ञानात

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी.व्ही.नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०४ वि जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर



त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले.

**आज त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई वतीने ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२७, मुंबई :** कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेच्या वतीने ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले असून सदर सभा रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता कुणबी समाजोन्नती संघ, (वाघे हॉल) सेंट झेवियर स्ट्रीट,टाटा हॉस्पिटल मागे,परळ मुंबई–४०००१२ येथे आयोजित करण्यात आली आहे.

**सभेपुढील विषय : १)** सभेसाठी अध्यक्षाची निवड करणे. **२)** दि.३० जुलै २०२४ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेचे मिनिट्स वाचन करणे व मंजुरी देणे **३)** दि. ३१ मार्च २०२५ अखेरचा व्यवस्थापक /कार्यकारणी समितीने सादर केलेल्या संस्थेच्या काम काजाचा अहवाल ताळेबंद व नफा तोटा पत्रक स्वीकारून त्यास मान्यता देणे.

**४)** १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी (अ) अध्यक्ष (ब) उपाध्यक्ष (क) सरचिटणीस (ड) २ चिटणीस (ई) खजिनदार (उ) ५ कार्यकारणी सभासद यांची निवड करणे **५)** सन २०२६ ते २०२७ या वर्षा करीता लेखा परीक्षक नेमणे ६) अध्यक्ष यांच्या वतीने येणारे इतर विषय, याप्रमाणे कामकाज व सभेपुढील विषय असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

त्याचबरोबर पुढीलप्रमाणे विशेष सूचनाही देण्यात आल्या असून १) चिट्टी मालकास सभेस हजर राहता आले नाही तर आपला प्रतिनिधी पाठवावा २) गणसंख्या अभावी सभा तहकूब झाल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने चालू करण्यात येईल त्यावेळी गणसंख्येची अट लागू होणार अशी नोंद सूचना देण्यात आली आली आहे. सभेला चिट्टी मालक/सभासद यांनी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन उपरोक्त संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी केले आहे.

### दिव्यातील तलावाची जागा बिल्डरांच्या घश्यात टाकण्याचा डाव : मनसेचा आरोप



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, दिवा (ठाणे) :** ठाणे –महापालिकेच्या माध्यमातून दिवा शहरातील दातीवली तलावाचे सुशोभिकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर तलावात भराव टाकल्याने तलाव लहान झाला आहे.

दरम्यान, दातीवली तलावाचे सुशोभिकरण करून तलाव लहान करून तलावाची जागा बिल्डरांच्या घश्यात टाकण्याचा डाव असल्याचा आरोप याप्रकरणी दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी केला आहे. दिव्यातील नागरिकांसाठी हा एकमेव असा तलाव असून येथे वर्षानुवर्षे अनेक उपक्रम होत असतात. गौरी गणपतीचे विसर्जन, माघी गणपतीचे विसर्जन, दुर्गा मातेचे विसर्जन मोठ्या प्रमाणावर केले जाते.

### पाटण शहरात कराड चिपळूण रस्त्यावर खड्डेच खड्डे



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि,२७, पाटण :** पाटण शहरात कराड चिपळूण महामार्ग अक्षरशा उध्वस्त झाला आहे. शासन व पाटण तालुका लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष पाटण कराड रस्त्याला कारणीभूत आहे. या रस्त्यावर बांधकाम अधिकारी मलमपट्टी करून वाहनधारकांची दिशाभूल करत आहेत. रस्त्याचा ज्या दिवशी खड्डा भरला त्याच्या दुसऱ्या दिवशीच डबल मोठा खड्डा पडत आहे. बांधकाम अधिकारी मग खड्डा भरतात की वाहनधारकांची दिशाभूल करतात अशा काम चलाओ अधिकाऱ्यांच्यावर वरिष्ठांनी कारवाई करावी अशी मागणी वाहनधारक करू लागले आहेत. कराड चिपळूण रस्त्यावर मोठ मोठ्या खड्डयातून वाहन चालवताना वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत आहे.

रस्त्यावर खड्डे असल्याने अपघात होऊन काही वाहन चालक जायबंदी झाले आहेत. तर खड्डयामुळे वाहनांचा खुळखुळा झाला आहे. तर वाहन चालकांचे मणके डिले झाले आहेत. आहेत अक्षरशा या रस्त्यावरून गाडी कशी चालवावी हेच वाहनधारकांना कळेनासे झाले आहे. पाटण शहरातील झेंडा चौक जुने बस स्थानक म्हावशी पेठ या ठिकाणी खड्डेच खड्डे बघायला मिळत आहेत. या रस्त्यावरून बांधकाम अधिकारी ये जा करताना त्यांना या रस्त्याची दुर्दशा दिसत नाही का असा संताप सवाल वाहनधारक करत आहेत. सध्या पाऊस संतधार पडत आहे. खड्डयात पाणी साठल्याने खड्डयाचा अंदाज वाहनधारकांना येत नाही. त्यामुळे अपघात होत आहेत. प्रशासनाने कराड चिपळूण राजमार्ग तातडीने सुव्यवस्थित करावा अशी मागणी वाहनधारक करू लागले आहे.

**पालकमंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली...**

पालकमंत्र्यांच्या तालुक्यात कराड चिपळूण रस्त्याची दुर्दशा बांधकाम अधिकाऱ्यांना रस्ता दुरुस्ती करण्याची दिली होती सूचना पण बांधकाम अधिकाऱ्यानी त्यांच्या सूचनेला केराची टोपली दाखवली आहे. पाटण शहरात कराड चिपळूण रस्ता खड्डेमुक्त अजून झालाच नाही.

## केअर इंडिया ग्लोबल फाउंडेशनच्या माध्यमातून पानसरेवस्ती शाळेत सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे उद्घाटन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२७, शिरवळ :** पानसरे वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेत कै. मयूर कृष्णा शिवतरे यांच्या स्मरणार्थ खासदार उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली केअर इंडिया ग्लोबल फाउंडेशनच्या अध्यक्षा धनगरवाडी आदर्श सरपंच सौ यमुना अमोल शिवतरे व त्यांचे कुटुंबीय यांच्यावतीने शाळेत दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले.

तसेच शाळेला सदैव मदत करणारे भाजप भाजप कार्यकारिणीचे सदस्य अनुप सूर्यवंशी या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी शाळेसाठी मुलांसाठी पाच हजार (५०००/–)रुपये लेखन साहित्य व वह्यांसाठी दिले. तसेच शाळेसाठी संरक्षण भिंत बांधून देण्याचे जाहीर केले.

केअर इंडिया ग्लोबल फाउंडेशन हे नेहमीच समाजा हितासाठी कार्यरत असणार आहे. तसेच हे फाउंडेशन सर्वसामान्यांसाठी एक आधारस्तंभ, दिशादर्शक याबरोबरच मार्गदर्शनपर त्यांच्या पाठीशी भक्कम उभे असणार आहे. याशिवाय केअर इंडिया ग्लोबल फाउंडेशन इथून पुढे सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक कामांमध्ये खा.छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली समाज उपयोगी विविध उपक्रम हाती घेणार आहे, असे केअर इंडिया ग्लोबल फाउंडेशनच्या अध्यक्षा यमुना अमोल शिवतरे यांनी सांगितले.

या कार्यक्रमावेळी कृष्णा शिवतारे, विमल शिवतरे, सरपंच यमुना अमोल शिवतरे तसेच अनुप सूर्यवंशी यांचा ग्रामस्थ व शाळेमार्फत सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महेश जाधव, विकास तांबे, प्रमोद कांबळे, भागवत चव्हाण पत्रकार तरुण भारत, हितेश जाधव, अभिजीत पिसाळ, भैय्या पिसाळ, अनिकेत पिसाळ, प्रवीण पिसाळ, शुभम गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन पानसरे, गावातील पालक, ग्रामस्थ, अंगणवाडी ताई उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाळेचे उपशिक्षक योगेश आहेर व मुख्याध्यापक राजेंद्र पिसाळ यांनी खूप परिश्रम घेतले.

## अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम...



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२६, डोंबिवली (ठाणे) :** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त डोंबिवली पोलीस स्टेशन हद्दीत आशुतोष डुंबरे (पोलीस आयुक्त, ठाणे शहर,) संजय जाधव, (अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण,) अतुल झेंडे, (पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण,) सुहास हेमाडे, (सहायक पोलीस आयुक्त, डोंबिवली विभाग, ) डोंबिवली गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डोंबिवली पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती आठवडा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने डोंबिवली पोलीस ठाणे येथे खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१) दि२४रोजी १५:४५ वा. ते १६:३० वा. चे दरम्यान डी. एन. सी. विद्यालय, डोंबिवली पुर्व येथे सपोनि/ प्रविण घुटुगडे व पोहवा/गणेश गिते यांनी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम घेतला. सदरवेळी ०२ शिक्षक, ७० ते ८० विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

२) दिनांक २५ रोजी ११:१० वा. ते १२:१५ वा. चे दरम्यान स.वा. जोशी विद्यालय व महाविद्यालय, डोंबिवली पूर्व येथे सपोनि/एल. बी. बोरा व पोहवा / गणेश गिते, पोलीस अंमलदार / अमित देसाई यांनी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम घेतला. सदरवेळी श्री. नलावडे मुख्याध्यापक, ०७ शिक्षक, १२५ ते१५० विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

३) दिनांक २५ रोजी १५:२५ वा. ते १६:५० वा. चे दरम्यान बी. आर. मढवी कॉलेज, डोंबिवली पुर्व येथे वपोनि गणेश जवादवाड, अमोल मडामे (नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य) व सपोनि/एल. बी. बोरा यांनी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम घेतला. सदरवेळी ०१ प्राचार्य, ०६ शिक्षक, १३० ते१५० विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

सदर अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त वरील विद्यार्थी यांना माहिती देवून, अंमली पदार्थाचे सेवनापासुन परावृत्त करणेबाबत मार्गदर्शन केले. त्यामध्ये विद्यार्थ्यांना अनोळखी व्यक्तीकडुन खाद्य पदार्थ स्विकारू नका, एका चुकीच्या निर्णयामुळे आयुष्य बदलु शकत, अंमली पदार्थाचे सेवन हे क्षणिक समाधान देत. पण कायम स्वरुपी वेदना आणि विनाश मागे ठेवते.

आई वडीलांची स्वप्न, मित्रांची साथ, खतःचे भविष्य सगळ संपवत, आज एक पाउल पुढे टाका, ड्रग्ज्ला नाही म्हणा आणि आयुष्याला हो म्हणा. अंमली पदार्थाचे सेवन म्हणजे मृत्युला आमंत्रण, चला नशा मुक्त भारत घडवुया. नशा नाही, दिशा हवी' तसेच चरस, गांजा, ड्रग्जचे सेवन करताना किंवा विक्री करताना कोणीही आढळल्यास डायल ११२ यावर माहिती द्या, आपला क्रमांक गोपनिय ठेवला जाईल याबाबत जनजागृती करण्यात आली.

## हवामानतज्ञ पंजाबराव डख उद्या टाकळी ढोकेश्वरमध्ये...

### * अमोल साळवे यांच्या वतीने शेतकरी मेळाव्याचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख उद्या रविवारी पारनेर तालुक्याच्या दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीमध्ये शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती युवा नेते अमोल साळवे यांनी दिली. डख यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

आदर्श शिक्षक, भूजल अभ्यासक आणि शेतकऱ्यांचे मार्गदर्शक स्वर्गीय सुखदेव साळवे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त येत्या रविवारी, दि.२९ जून रोजी सकाळी १० वाजता टाकळी ढोकेश्वर येथे भव्य शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राज्यातील प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख उपस्थित राहून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. स्व. सुखदेव साळवे यांनी आपल्या भूजल संशोधन आणि शेतीविषयक मार्गदर्शनाने संपूर्ण महाराष्ट्रात विशेष ओळख निर्माण केली होती. त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. पंजाबराव डख, जे आपल्या अचूक हवामान अंदाज आणि शेतीविषयक सल्ल्यांसाठी ओळखले जातात, ते या मेळाव्यात शेतकऱ्यांना हवामान बदल, पिकांचे नियोजन आणि शाश्वत शेती पद्धतींवर मार्गदर्शन करणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना यंदाच्या खरीप हंगामासाठी योग्य नियोजन करण्यास मदत होईल. हा मेळावा टाकळी ढोकेश्वर येथील भीमप्पा लॉन्स् येथे होणार असून, यात शेतकऱ्यांना आपले प्रश्न थेट तज्ञांसमोर मांडण्याची संधी मिळेल.

पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, मित्रपरिवार आणि देवकृपा प्रतिष्ठान यांच्या वतीने सर्व शेतकरी बांधव, नागरिक आणि हितचिंतकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्व. साळवे यांच्या कार्याचा गौरव करताना शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि हवामान बदलाशी सामना करण्याच्या पद्धतींची माहिती मिळावी, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. उपस्थितांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आयोजन अमोल साळवे व देवकृपा फाउंडेशने कळविले आहे.

## धाराशिव नगरीत संत श्री गजानन महाराज शेगाव पालखीचे स्वागत...



**अक्षराज : विकास वाघ**

**दि,२७, धाराशिव :** संत श्री गजानन महाराज शेगाव पालखीचे धाराशिव शहरात भक्तिमय वातावरणात उत्साहात स्वागत करण्यात आले. पालखी सोबत डॉ. प्रतापसिंह पाटील व व्ही.पी.शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजी नगर रोड, धाराशिव यांच्या वतीने फिजिओथेरपी कॅम्प व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

ज्यात वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी आणि उपचारांची सोय करण्यात आली होती. या शिबिराचा ४७८ वारकरी बांधवांनी लाभ घेतला.

या शिबिरात विविध आरोग्य तपासण्या जसे की रक्तदाब,मधुमेह, आणि इतर सामान्य आजाराची तपासणी करण्यात आली. तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार आणि फिजिओथेरपीची सोय देखील करण्यात आली होती. या शिबिरामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण झाली आणि त्यांना आरोग्य सेवांचा लाभ घेता आला.

या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील,मा. नगरसेवक कुणाल निंबाळकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, युवती जिल्हाध्यक्ष श्वेता दुरुगकर, तालुका उपाध्यक्ष जयंत देशमुख, अमोल सुरवासे, डॉ. संतोष मुळे व अशोक चौधरी उपस्थित होते.शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. पूजा आचार्य, डॉ. गणेश गोरे, डॉ. चाकवते, डॉ. शेख तसेच वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, आर. पी. फार्मसी कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# चंद्रपूर बायपास मार्गाचे बांधकाम तातडीने सुरु करा

## खासदार धानोरकर यांची केंद्रीय मंत्री गडकरींकडे मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** शहराची वाढती लोकसंख्या आणि बाहेरील वाहनांची वाढती वर्दळ यामुळे चंद्रपूरमध्ये वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून चंद्रपूर शहरातील पडोली फाटा ते शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या दरम्यान बायपास मार्गाच्या तातडीने बांधकाम करण्याची मागणी केली आहे.



सध्या नॅशनल हायवे ९३० आणि नॅशनल हायवे ९३० डी या राष्ट्रीय महामार्ग दरम्यानची वाहतुक थेट चंद्रपूर शहरातून जाते. गडचिरोली, तेलंगना, यवतमाळ वर्धा आणि नागपूर यासारख्या विलिध ठिकाणांहून येणारी आणि जाणारी वाहने चंद्कपूर शहरातून सातत्याने ये-जा करत असल्याने शहरात वाहतुक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. या वाढत्या वाहतुकीमुळे शहरात अपघातांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर वाढले आहे.

ज्यामुळे नागरिकांना मोठा त्रास आणि धोका सहन करावा लागतो. या गंभीर समस्येवर तातडीने उपाययोजना म्हणून, खासदार धानोरकर यांनी पडोली फाटा ते शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय दरम्यान बायपास मार्गाचे बांधकाम करण्याची मागणी केली आहे. हा बायपास मार्ग नॅशनल हायवे ९३० आणि नॅशनल हायवे ९३० डी दरम्यानच्या वाहतुकीला शहराबाहेरुन वळवावे. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना विनंती केली आहे कि, या अत्यंत महत्वाच्या मागणीवर सकारात्मक विचार करुन त्वरित कार्यवाही करावी आणि चंद्रपूरकरांना वाहतुक कोंडी आणि अपघातांच्या त्रासातून मुक्त करावे, अशी मागणी ही खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पत्रातून केली आहे.

# आषाढी वारी कालावधीत महिला भाविकांच्या सुरेक्षेबाबत आवश्यक दक्षता घ्या - डॉ. निलम गोऱ्हे

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२७, सोलापूर :** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या यात्रेसाठी पायी पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. पालखी सोहळ्यासोबत येणा-या वारकरी भाविकांना पालखी मार्गावर व तळांवर तसेच यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात व परिसरात सर्व पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच पालखी सोहळ्यासोबत महिला भाविकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना आवश्यक सुविधा देण्यासोबत त्यांच्या सुरक्षेबाबत विशेष दक्षता घ्यावी अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिल्या.





आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री रुक्मिणी मंदीर देवस्थान व जिल्हा प्रशासनासोबत ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सूचना दिल्या. यावेळी ऑनलाईन बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अप्पर पोलीस अधिक्षक प्रीतम यावलकर, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महावितरणचे माने, कार्यकारी अभियंता अमित निमकर, भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हरसुरे, तहसीलदार सचिन लंगुटे, महिला बाल विकास अधिकारी रमेश काटकर, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पालखी मार्गावर हिरकणी कक्ष, चेंजिंग रूम, सॅनिटरी नॅपकिन, वेडींग मशीन आदी व्यवस्थेची मुबलक उपलब्धता ठेवावी. पालखी मार्गावर लहान दिंड्यांनसाठी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करावी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्याही आरोग्य सुरक्षेची काळजी घेऊन त्यांना आवश्यक साधनांचा पुरवठा करावा. चंद्रभागा नदीपात्रात वाळूचे खड्डे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच धोक्याच्या ठिकाणी माहिती फलक व लाल रंगाच्या झेंड्याच्या निशाणी लावाव्यात. घाट दुरुस्तीची कामे करावीत. वारी कालावधीत अखंडित वीजपुरवठा राहील याची दक्षता घेऊन आवश्यक ठिकाणी मुबलक प्रकाश व्यवस्था करावी. वारी कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात पाणी पातळी योग्य प्रमाणात राहील याचे नियोजन करावे वारी कालावधीत शहरातील नागरिकांना तसेच भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी. घनकचरा व्यवस्थापनाबाबत पंढरपूर शहर योग्य नियोजन करावे. परिवहन विभागाने पालखी मार्गावर अपघात प्रवण क्षेत्राच्या ठिकाणी पथके तैनात ठेवावीत कोविडच्या अनुषंगाने आरोग्य विभागाने आवश्यक ते नियोजन करावे. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयातील जनरेटर व्यवस्था सुस्थितीत ठेवावी.

तसेच एसटी महामंडळाने महिला भाविक प्रवाशांसाठी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. वारी कालावधीत एसटी बस मधून प्रवास करणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते यासाठी महिला भाविकांसाठी काही अडचणी आल्यास तसेच महिला व बालके हरवल्यास टोल फ्री हेल्पलाइन नंबर प्रसिद्ध करावा तसेच तो प्रत्येक एसटी बस मध्ये लावावा. त्याचबरोबर लांब पल्ल्याच्या एसटी बस मध्ये रात्रीच्या वेळी लाईट चालू ठेवाव्यात. चंद्रभागा नदीपात्रा लगत असणाऱ्या दत्तघाटावर अनाथ मुले वयस्कर व मतिमंद नागरिकांना सोडून देण्यात येते. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महिला बाल विकास व सामाजिक न्याय विभागाने पथके नेमावीत या पथकात महिला पथकांचाही समावेश करावा अशा सूचनाही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले,आषाढी यात्रा सोहळ्यात वारकऱ्यांना केंद्रबिंदू मानून व स्वच्छतेला प्राधान्य देऊन आषाढी वारीचे नियोजन करण्यात आले आहे. वारी कालावधीत पाऊस जास्त होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व पालखीतळांवर मुरमीकरण करण्यात आले आहे. तसेच पालखी मार्गावर भाविकांच्या सुविधेसाठी जर्मनी हँगर, वॉटरप्रूफ मंडप उपलब्ध करण्यात येणार आहेत. पालखी मार्गावर व तळांवर शहरात मुबलक टॉयलेट, पाणीपुरवठा, सुरक्षा, महिला भाविकांसाठी सुलभ शौचालय, स्नानगृह, हिरकणी कक्ष, सॅनिटरी नॅपकिन, चेंजिंग रूम, वेंडिंग मशीन यांची उपलब्धता ठेवण्यात येणार आहे.

तसेच आरोग्य सुरक्षेसाठी मुबलक औषधे सुसज्ज रुग्णवाहिका आरोग्य केंद्र उपलब्ध करण्यात येणार आहेत.

पंढरपूर शहरात वारकरी भाविकांना अडथळा येऊ नये यासाठी अतिक्रमण मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच शहरात वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी साडेतीनशे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आले आहेत असेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# मंगळवेढा तालुक्यासाठी ३ टन तुरीचे बियाणे उपलब्ध- आ. आवताडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२७, पंढरपूर :** सध्याच्या हंगामामध्ये शेतकऱ्यांसाठी तूर बियाणे उपलब्ध झाले असून मंगळवेढा कृषी कार्यालयाकडे तीन टन तुरीचे बियाणे उपलब्ध झाले आहे तरी तूर लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून या चांगल्या प्रतीच्या बियाण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार समाधान आवताडे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.



यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले की,केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अर्थसंकल्पात संपुर्ण देशात कडधान्य मिशन राबविण्याची घोषणा केली आहे. हे मिशन पुढिल सहा वर्षासाठी असेल. केंद्रिय कृषि मुल्य आयोग मार्फत खरीप सन २०२५-२६ साठीचे हमीभाव जाहीर करण्यात आले असून सर्व कडधान्याच्या हमिभावांमध्ये ५ टक्के पेक्षा जास्त वाढ केली आहे. तूर पिकाचा हमिभाव मागील ७ हजार ५५० रुपये प्रती क्किंटल वरून ८ हजार रुपये प्रती क्किंटल करण्यात आला आहे. तसेच उडीद पिकाचा हमिभाव

मागील ७ हजार ४०० रुपये प्रती क्किंटल वरून ७ हजार ८०० रुपये प्रती क्किंटल करण्यात आला आहे. शेतक-यांकडून कडधान्याची नाफेड व एनसीसीएफ खरेदी करणार आहे. या दोन एजन्सीकडे नोंदणी केलेल्या शेतक-यांची संपुर्ण तूर व उडीद खरेदीची शाश्वती देण्यात आली आहे. कृषि विभाग मार्फत तूरीच्या वाढीच्या आवस्थे दरम्यान विविध शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात किड व रोगाच्या व्यवस्थापना संदर्भात मार्गदर्शन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

तरी जास्तीत जास्त शेतक-यांनी कृषि विभागा मार्फत तूरीचे बियाणे प्राप्त करुन पेरणी करावी असे आवाहन आमदार समाधान कडे यांनी केले आहे.

या संदर्भात सविस्तर माहिती सांगताना तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ यांनी सांगितले की, तुरीचे (वाण - भिमा) बियाणे उपलब्ध झाले आहे. सदर तूर लाल रंगाची असून बागायत व जिरायत दोन्ही प्रकारे पाण्याचा निचरा होणा-या सर्व प्रकारच्या जमिनीमध्ये लागवडीसाठी योग्य आहे. दोन ओळीतील अंतर ६ फुट व दोन रोपातील अंतर २ फुट तसेच दोन ओळीतील अंतर ५ फुट व दोन रोपातील अंतर २ फुट लागवड केल्यास चांगले उत्पन्न मिळू शकते तसेच एकरी ७००-९०० ग्रॅम बियाणे पुरेसे आहे. कृषि विभागामार्फत वाटप करण्यात येणारे बियाणे ४ किलो पॅकिंग मधील असून एका बॅग मध्ये ५ एकर तूरीची पेरणी होवू शकते. तुरीचे भिमा वाण १० जुलै पर्यंत लागवडीसाठी फायदेशीर असून योग्य व्यवस्थापन केल्यास एकरी ८ ते १० क्किंटल उत्पादन मिळू शकते. तूर पेरणी वेळी प्रती किलो बियाण्यास १० ग्राम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रीया केल्यास मर रोगाचे प्रमाण अटोक्यात राहते त्याच बरोबर जैविक जिवाणूसंघाची प्रती किलो बियाण्यास १० मिली बिजप्रक्रीया केल्यास उत्पन्न १० ते २० टक्के वाढू शकते. पेरणी करताना एकरी ५० किलो डिएपी खताची मात्रा द्यावी. बियाणे उगवून आल्यानंतर पहिल्या २० ते ३० दिवसाच्या आत रोपांची विरळणी करुन रोपातील अंतर ६ । २ किंवा ५२ राहिल याची दक्षता घ्यावी. विरळणी झाल्या नंतर ५ टक्के निंबोळी अर्क व २ टक्के युरियाची फवारणी करावी. पहिलीछाटणी ४०-४५ दिवसात व दुसरी छाटणी ६० ते ६५ दिवसात करुन घ्यावी. इच्छूक शेतक-यांनी संबंधीत गावच्या कृषि सहाय्यकण यांच्याशी संपर्क करावा असे अहवान तालुका कृषि अधिकारी श्रीमती मनिषा मिसाळ यांनी केले आहे.

# थोडक्यात

## निघोजमध्ये जैन स्थानकाच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सेवाभावाने कार्य करणे अत्यंत आवश्यक असून समाजातील प्रत्येक घटकाने या दृष्टीने पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन महावीर उद्योग समुहाचे सर्वेसर्वा व पारनेर तालुका जैन समाज महासंघाचे अध्यक्ष युवा उद्योजक राजेश भंडारी यांनी व्यक्त केले. निघोज येथे जैन समाजाच्या नवीन स्थानकाच्या भुमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी माजी सभापती कुंदनकाका साखला, गणेशशेठ कटारिया, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद, निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, माजी सरपंच ठकाराम लंके, जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, ग्राम.पं.सदस्या सुधामती कवाद, बाळासाहेब ढुमणे, नामदेवराव थोरात, चेतन भळगट, सुभाष वराळ आदींसह मान्यवर उपस्थित होते. जैन समाजाचे जुने स्थानक हे सुमारे ६० वर्षांपूर्वी बांधण्यात आले होते. कालबाह्य झालेल्या या इमारतीच्या जागी ४ हजार स्क्वेअर फूट क्षेत्रफळ असलेली नवीन तीन मजली भव्य इमारत उभारण्यात येणार आहे. या बांधकामासाठी ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, प्रत्यक्षात हा खर्च अधिक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावेळी राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन समाजबांधवांनी घेतले. तसेच वाजत गाजत मिरवणूक काढीत ग्रामस्थ व समाजबांधव कार्यक्रमस्थळी आले. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करीत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन ज्येष्ठ मार्गदर्शक सुर्यकांत लोढा, कुंदनमल लोढा, व्यापारी असोसिएशन पदाधिकारी सुदर्शन लोढा, जैन महासंघाचे प्रवक्ते यश लोढा आदि समाजबांधवांनी केले.

## ढोकेश्वर विद्यालयात शाहू महाराज जयंती साजरी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** राजश्री शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी व सामाजिक न्यायाचे प्रणेते होते. शाहू महाराजांनी जाती निर्मुलनासाठी संघर्ष करून सामाजिक समता प्रस्थापित करणारे लोककल्याणकारी राजा म्हणून राजश्री शाहू महाराजांची ओळख आहे. असे उद्गार अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य तसेच सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टाकळी ढोकेश्वर येथे लोकराजा राजश्री शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले, शाहू महाराज हे सक्षम राज्यकर्ते असून त्यांनी प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी खुले केले. सनातनी विचारसरणीचा विरोध न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी लढा दिला. महात्मा फुले, शाहू - आंबेडकरांच्या वैचारिक वारशामुळे महाराष्ट्राला विशेष ओळख लाभली आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य सुनील वाव्हळ व विद्यालयाचे सर्व शिक्षक यांच्या हस्ते राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली गायखे, सुत्रसंचलन अतुल सैद व आभार नीलम खिलारी यांनी केले.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष सोनावळे,कला विभागाचे विजय सोबले, विज्ञान विभागाचे अशोक गांगड, जेष्ठ शिक्षक मल्हारी वाघस्कर, शिवाजी नरसाळे, भाऊसाहेब हिंगडे, बाबासाहेब जाधव, रविंद्र ज्योतिक, नारायण शेळके, सुरेखा ठाणगे, प्रिया डव्हणे आदिंसह विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उत्तम शरीरस्वास्थ्य तर जीवन मस्त - उपशिक्षणाधिकारी किरतकुडवे

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२६, मुंबई :** शालेय विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच स्वतः ला व्यायाम आणि खेळाची सवय लावून घेतली तर आपले आरोग्य उत्तम प्रकारे जपता येईल. कारण आपले शरीर स्वास्थ्य उत्तम आणि निरोगी असेल तरच आपले जीवन आपल्याला मस्तपणे व आनंदाने जगता येईल. असे मत बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचे (मध्यवर्ती) उपशिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे यांनी व्यक्त केले. ते आज शिक्षणाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या महापौर क्रीडा शिष्यवृत्ती वितरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पुढे बोलताना उपशिक्षणाधिकारी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेक न करता अभ्यासात कठोर मेहनत घ्यावी आणि स्वतः ला सिद्ध करून दाखवावे. शिष्यवृत्ती ही तुमच्या कामात सातत्य राखण्यासाठी पाठीवर मारलेली प्रोत्साहनात्मक थाप आहे.

यावेळी शारीरिक शिक्षण विभागाचे वरिष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये दत्तू लवटे यांनी शासकीय स्पर्धेत सहभागी झालेले एकूण विद्यार्थी व राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी यांची संख्यात्मक मांडणी सांगितले. गेल्यावर्षी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळांमधून ३ हजार सातशे विद्यार्थी शासकीय स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यापैकी माध्यमिक विभागाचे ६४ तर प्राथमिक विभागाचे २४ असे एकूण ८८ विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर पोहचले आहेत.

या ८८ विद्यार्थ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिके तर्फे द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्याला ८ हजार, तृतीय क्रमांक मिळवणाऱ्याला ५ हजार आणि सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३ हजार रुपये शिष्यवृत्तीचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी संधी मिळते आणि त्याला जवळपास १५ हजार रुपये शिष्यवृत्ती सरकार तर्फे दिली जाते. यावेळी उपशिक्षणाधिकारी अजय वाणी यांनीही विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.

तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी लोकसहभाग कक्षाचे उपशिक्षणाधिकारी मुक्तार शहा, अधीक्षक किसन केंकरे, आरती खेर, प्राचार्या सत्यशीला कांबळे यांच्यासह शा.शि.चे सर्व कनिष्ठ पर्यवेक्षक मुख्याध्यापक, शारीरिक शिक्षण शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ पर्यवेक्षक अनिल सनेर यांनी केले.